


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.

वर्ष : ०५ | अंक : १०४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२७ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# घरच्या मैदानातच व्हाईट वॉश ! गुवाहाटीत टीम इंडियाचा सुपडा साफ

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, गुवाहाटी :**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाचा क्लीन स्वीप झाला आहे. गुवाहाटी येथे खेळल्या जाणाऱ्या मालिकेतील दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ४०८ धावांनी विजय मिळवला. शेवटच्या डावात भारतासमोर विजयासाठी ५४९ धावांचे लक्ष्य होते. संघाचा डाव फक्त १४० धावांवर बाद झाला. दक्षिण आफ्रिकेने मालिकेतील पहिला सामना ३० धावांनी जिंकला होता. धावांच्या बाबतीत हा भारतीय संघाचा सर्वात मोठा कसोटी पराभव आहे.

दुसऱ्या कसोटीत भारताला ४०८ धावांनी पराभव पत्करावा लागला आणि दक्षिण आफ्रिकेने २-० अशी ऐतिहासिक मालिका जिंकली. दक्षिण आफ्रिकेने २५ वर्षांनंतर ही भारतात कसोटी मालिका जिंकली. दक्षिण आफ्रिका हा घरच्या मैदानावर भारताला दोनदा क्लीन स्वीप करणारा पहिला संघ ठरला. यापूर्वी, १९९९-२००० मध्ये दक्षिण आफ्रिकेने भारताला कसोटी मालिकेत २-० ने हरवले होते.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना गुवाहाटी येथील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्याचा निकाल खेळाच्या शेवटच्या आणि पाचव्या दिवशी लागला. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात दक्षिण आफ्रिका ४८९ धावांवर सर्वबाद झाली.

पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेकडून सेनुरन मुथुस्वामीने २०६ चेंडूत १०९ धावा केल्या, ज्यामध्ये १० चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. हे त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक होते. मार्को यान्सेननेही ९३ धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवने ४ बळी घेतले, तर जडेजा, बुमराह आणि सिराज यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.



प्रत्युत्तरादाखल, टीम इंडिया २०१ धावांवर सर्वबाद झाली. भारताच्या पहिल्या डावात फक्त यशस्वी जयस्वाल ५० पेक्षा जास्त धावा करू शकला. यशस्वीने ५८ धावांची खेळी केली. त्याच्याशिवाय वॉशिंग्टन सुंदरने ४८ धावा केल्या. सुंदरने कुलदीप यादवसह ८ व्या विकेटसाठी ७२ धावा जोडल्या, ज्यामुळे भारत काहीसा सन्मानजनक धावसंख्या गाठू शकला. दक्षिण आफ्रिकेसाठी मार्को यान्सनने ६ बळी घेतले आणि सायमन हार्मरला तीन यश मिळाले. दक्षिण आफ्रिकेला पहिल्या डावात २८८ धावांची आघाडी मिळाली आणि त्यांनी फॉलोऑन करण्याचा निर्णय घेतला नाही. दुसऱ्या डावात फलंदाजी करताना, दक्षिण आफ्रिकेने २६० धावा केल्यानंतर डाव घोषित केला, त्यामुळे भारताला दुसरा कसोटी सामना जिंकण्यासाठी ५४९ धावांचे लक्ष्य देण्यात आले.

---

## माजी सैनिकांनी देशसेवेनंतर सामाजिक कार्य करावे : अण्णा हजारे



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** सैन्य दलामध्ये देशसेवेसाठी कार्य केले. माजी सैनिकांनी सेवावृत्तीनंतरही अखेरच्या श्वासापर्यंत देशाभिमान बाळगत गावातील तसेच इतर सामाजिक कार्यात सक्रिय राहून एक वेगळी ओळख निर्माण करावी, सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले.पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथे माजी सैनिक संघटनेच्या वतीने आयोजित स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.

पुढे,बोलताना अण्णा हजारे यांनी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नरसाळे आणि तालुकाध्यक्ष कॅप्टन विठ्ठल वराळ या दोघांनी गोरेगाव येथे माजी सैनिकांना एकत्र आणून स्नेहसंमेलन आयोजित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी भरभरून अभिनंदन केले. कर्नल साहेबराव शेळके यांनी माजी सैनिकांना निवृत्तीनंतर रोजगार किंवा शेतीकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला. तसेच, सध्याच्या तरुणांनी सैन्यात मोठ्या संख्येने भरती व्हावे यासाठी मार्गदर्शन मेळावे आयोजित करत असल्याची माहिती त्यांनी दिली. लवकरच पारनेर येथे सैनिकांना सहाय्यता केंद्र उभारले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

माजी सैनिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे म्हणाले की, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नरसाळे यांच्या नेतृत्वाखाली नगर जिल्ह्यात माजी सैनिकांचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडवले जात आहेत. या कार्याला अधिक बळ देण्यासाठी आणि संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्व माजी सैनिकांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, शहीद जवान वीरपत्नी व माजी सैनिकांच्या गुणवंत पाल्यांचा विशेष गौरव करण्यात आला. पारनेर महाविद्यालयाच्या एनसीसीच्या विद्यार्थिनींनी झांज पथकाचे सादरीकरण लक्ष वेधले. नगर आर्मर कोअरच्या बॅण्ड पथक मिरवणूकने लक्ष वेधून घेतले.

या स्नेहमेळाव्याला जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नरसाळे, कर्नल साहेबराव शेळके, राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे, कॅप्टन विठ्ठल वराळ, माजी सैनिक बबनराव खिलारी, मेजर दिगंबर शेळके, मेजर संजय खिलारी, मेजर संतोष आल्हाट, गणेश बांडे, यांच्यासह जिल्ह्यातील पाचशेहून अधिक माजी सैनिक,वीरपत्नी व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची ३४ वी सभा संपन्न !

## ऊस लागवड व व्यवस्थापनावर मार्गदर्शन



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, दि.२६, बुलढाणा :** कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा यांच्या वतीने मौजे सातगाव म्हसला येथे शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची ३४ वी सभा उत्साहात पार पडली. राजूभाऊ उर्फ अवचीतराव पालकर यांच्या शेतात झालेल्या या सभेत ऊस लागवड व व्यवस्थापनाविषयी कृषी तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

मुख्य उपस्थिती : अनिल गुंजाळ (अध्यक्ष, पैनगंगा साखर कारखाना), श्री. म्हस्के (व्यवस्थापकीय संचालक), डॉ. अमोल झापे (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख), डॉ. भारती तिजारे, प्रवीण देशपांडे, डॉ. जगदीश वाडकर, मनेश यदुलवार, डॉ. दिनेश कानवडे, डॉ. आशुतोष लाटकर, मनोजकुमार ढगे तसेच शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष विजय भुतेकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेनंतर शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यात फलदायी चर्चासत्र झाले तसेच उपस्थितांनी ऊस प्रक्षेत्राचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मनेश यदुलवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजूभाऊ पालकर व सातगाव म्हसला ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

---

# मुल-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग दुरुस्तीला गती, २५ डिसेंबरपर्यंत होईल पूर्ण!

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे महत्त्वपूर्ण निर्णय

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.२६, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे मुल–चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग (एन.एच. ९३०) दुरुस्तीचे काम वेगाने सुरू आहे. येत्या २५ डिसेंबर २०२५ पर्यंत संपूर्ण रस्त्याची दुरुस्ती पूर्ण होणार असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थी व आपत्कालीन सेवांना मोठा दिलासा मिळणार आहे. या संदर्भातील कामाच्या प्रगतीबाबतची माहिती राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता केळकर यांनी आज, मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी आ. मुनगंटीवार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन दिली. यापूर्वी आ. मुनगंटीवार यांनी नागपूर येथे विकासपुरुष केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांची भेट घेऊन महामार्ग दुरुस्तीची आग्रही मागणी केली होती. त्यानंतर तात्काळ केंद्रीय मंत्री गडकरी यांनी संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले, याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. केळकर यांनी सांगितले की, मूल ते बंगाली कॅम्प / सावरकर चौकापर्यंत एकूण ३९.६७४ किलोमीटर रस्त्याच्या दुरुस्ती सोबत रस्त्यावर बीटी पॅचवर्क, ओव्हरले वर्क आणि थर्मो प्लास्ट रोड मार्किंगचे काम करण्यात येणार आहे. या दुरुस्तीमुळे वाहतुकीची क्षमता वाढेल आणि रस्त्याची सुरक्षितता अधिक मजबूत होईल.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वी नागपूर येथे केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांची भेट घेऊन महामार्गाच्या दुरुस्तीबाबत निवेदन दिले होते. या निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद देत ना.नितीन गडकरी यांनी



तातडीने संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. कामाला सुरुवात झालेली असून आज राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता केळकर यांनी आज आ. मुनगंटीवार यांची जनसंपर्क कार्यालय चंद्रपूर येथे प्रत्यक्ष भेट घेऊन माहिती दिली. मुल–चंद्रपूर महामार्गावर दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. या मार्गावरून सामान्य नागरिक, विद्यार्थी, उद्योग, आपत्कालीन सेवा (ॲम्ब्युलन्स, फायर ब्रिगेड) यांना त्रास सहन करावा लागत होता. या परिस्थितीत रस्त्याचे लवकर पूर्ण होणारे काम नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, हा महामार्ग फक्त रस्ता नाही, तर मुल आणि चंद्रपूरच्या आर्थिक, व्यावसायिक आणि सामाजिक प्रगतीचा मुख्य दुवा आहे. नागरिकांची सुरक्षित व सुलभ वाहतूक सुनिश्चित करणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे आणि त्यामुळे हे काम वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. मुल–चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग दुरुस्ती कामाला तात्काळ निर्देश दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली आहे.

---

# पारनेर शहरासह ग्रामीण भागाच्या विकासकामांना मंजुरी !

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात पारनेर शहरातील व तालुक्याच्या अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तब्बल २ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली असून या निर्णयामुळे पारनेर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला मोठा वेग येणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या मंजूर कामांमध्ये नगरपंचायत क्षेत्रातील अर्बन बँकेजवळ जैन भवन इमारत बांधकाम २० लक्ष, राजे कब्रस्तान संरक्षक भिंत व सुशोभीकरण १० लक्ष, आनंद हॉस्पिटल शेजारील अल्पसंख्यांक वस्ती रस्ता कॉंक्रिटीकरण ७ लक्ष, गैबीशा वली दर्गा परिसर सुशोभीकरण करणे १०



लक्ष, सुपा रस्ता गैबीशा वली दर्गा येथे स्ट्रीट लाईट बसविणे ५ लक्ष, सुपा रस्ता डॉ. सय्यद घर अकिल सय्यद घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे १० लक्ष, अकिल सय्यद घर ते कांदा मार्केट रस्ता कॉंक्रिटीकरण करणे, १० लक्ष, सुपा रस्ता ते गैबीशा वली दर्गा गटार लाईन करणे १० लक्ष, राजे मशिद परिसर सुशोभीकरण करणे ८ लक्ष या कामांचा समावेश आहे.

ग्रामीण भागातील मंजुर झालेल्या कामांमध्ये पिंपळगाव तुर्क येथे १० लक्ष रुपयांच्या मुस्लीम कब्रस्तान येथे पाणी टाकी व पाईप लाईन करणे, १० लक्ष रुपयांच्या हिवरे कोरडा येथील कब्रस्तान सुशोभीकरण करणे, १० लक्ष रुपयांच्या रांजणगाव येथील कब्रस्तान येथे शुशोभीकरण व वीज पुरवठा करणे,

१० लक्ष रुपयांच्या धोत्रे बु. येथील मशिद परिसर सुशोभीकरण करणे, १० लक्ष रुपयांच्या ढवळपुरी येथील मुस्लीम वस्ती येथील मशिद परिसरात सार्वजनिक स्वच्छता गृह उभारणे व संरक्षण भिंत बांधणे, १० लक्ष रुपयांच्या पिंपळगाव रोठा येथील मुस्लीम मस्जिद समोरील जागेत सभामंडप करणे, १० लक्ष रुपयांच्या सांगवी सूर्या येथील हजरत पीरशहा सिकंदर बाबा दर्गा परिसरात स्वच्छता गृह बांधकाम करणे, १० लक्ष रुपयांच्या सांगवी सूर्या येथील जवळे - वडुले रस्ता ते हजरत पीरशहा सिकंदर बाबा दर्गा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे, १० लक्ष रुपयांच्या म्हसणे सुलतानपुर येथील मुस्लीम स्मशानभूमी साठी संरक्षक भिंत बांधकाम करणे आणि १० लक्ष रुपयांच्या दरोडी येथील पीर शेख ट्रस्ट येथे सौर पथदिवे बसविणे आदी कामांचा समावेश असून ग्रामीण भागासाठी १ कोटी व शहरी भागासाठी १ कोटी अशा एकुण २ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

### आ.काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश !

पारनेर शहरासह ग्रामीण भागातील नागरी विकासाची घोडदौड सुरू होणार असून अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत सुविधांच्या समस्यांचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. नागरिकांच्या जीवनमानात मोठी सुधारणा होणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली असून या निधीमुळे पारनेर शहराचा विकास अधिक वेगाने होईल आणि सामान्य नागरिकांची अपेक्षा पूर्ण करण्यास मदत होईल असा विश्वास आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केला. नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत आमदार दाते यांचे आभार व्यक्त केले असून आगामी कामांच्या शुभारंभाची उत्सुकता व्यक्त केली आहे.




## पडद्यावरील ही मॅन काळाच्या पडद्याआड

१९६० ते १९८० हा काळ हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्णकाळ समजला जातो. या सुवर्णकाळाने हिंदी चित्रपट सृष्टीला एका पेक्षा एक असे अनेक महान कलाकार दिले. या कलाकारांनी आपल्या अभिनयाने हिंदी चित्रपट सृष्टीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आता मात्र या सुवर्ण काळाचे साक्षीदार असलेले महान कलाकार एक एक करून आपल्याला सोडून चालले आहेत. असेच एक महान कलाकार ज्यांनी आपल्या अभिनयाने आणि देखणेपणाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले ते हिंदी चित्रपट सृष्टीतील एक महान कलाकार धर्मेंद्र हे ही प्रेक्षकांना कायमचे सोडून गेले. अभिनेते धर्मेंद्र यांनी सोमवारी, २४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर एकूणच मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली. ८ नोव्हेंबर १९३५ रोजी जन्मलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मोहित केले. १९६० साली अभिनय क्षेत्रात पदार्पण केलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास ३०० हून अधिक चित्रपटात भूमिका केल्या . दिल भी तेरा हम भी तेरे हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला चांगले यश मिळाले. राजबिंडा चेहरा आणि मोहक हास्य आणि पिळदार शरीरयष्टी यामुळे त्यांना अनेक रोमँटिक भूमिका मिळाल्या. कारकिर्दीच्या सुरुवातील एक रोमँटिक हिरो म्हणून त्यांनी मोठा पडदा गाजवला. मीना कुमारी, सायरा बानू, शर्मिला टागोर, आशा पारेख, माला सिन्हा, परवीन बाबी, हेमा मालिनी, रीना रॉय, राखी, जया प्रदा या त्या काळातील सर्व मोठ्या अभिनेत्रींसोबत त्यांनी स्क्रीन शेअर केली. पुढे त्यानी ॲक्शनपटात भूमिका केल्या. १९७६ ते १९८४ या काळात त्यांनी अनेक त्यांनी ॲक्शनपट केले. धर्मेंद्र मोठ्या पडद्यावर गुंडांबरोबर नेहमीच दोन हात करत म्हणून त्यांची गरम - धरम आणि ही मॅन अशी ओळख निर्माण झाली. ही मॅन ही बिरुदावली तर त्यांना कायमची चिकटली म्हणूनच त्यांच्या निधना नंतर पडद्यावरचा ही मॅन काळाच्या पडद्याआड गेला अशी बातमी टीव्ही चॅनलवर झळकली. धर्मेंद्र यांनी त्या काळातील सर्व महान दिग्दर्शकांसोबत काम केले. बिमल रॉय, जे पी दत्ता, मोहन कुमार, राजकुमार कोहली, राज खोसला, रमेश सिप्पी या दिग्दर्शकांनी त्यांना आपल्या चित्रपटात नेहमीच संधी दिली. अर्जुन हिंगोरानी यांच्या जवळपास सर्व चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. हकिकत, ममता, अनुपमा, आये दीन बहार के, मेरे हमदम मेरे दोस्त, इज्जत, आँखें, सत्यकाम, आया सावन झुमके, जीवनमृत्यू, मेरा गाव मेरा देश, सीता और गीता, यादोंकी बारात, चुपके चुपके, शोले, धरमवीर, ब्लॅकमेल, जुगणू, कलाकार, दिल्लगी, द बर्निंग ट्रेन, राम बलराम, गुलामी, हुकूमत, बटवारा, क्षत्रिय, जॉनी गद्दार हे आणि यासारखे त्यांनी अभिनय केलेले अनेक चित्रपट गाजले त्यातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यांच्या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय ठरली. त्यांनी अभिनय केलेल्या शोले या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटात त्यांनी साकारलेल्या वीरू या पात्राने तर जवळपास चार पिढ्यांवर अधिराज्य गाजवले. शोले आणि त्यातील जय वीरू याशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहासच पूर्ण होऊ शकत नाही. शोले चित्रपटाची शूटिंग चालू असतानाच ते हेमा मालिनीच्या प्रेमात पडले आणि पुढे दोघांनी लग्न केले. अभिनेते धर्मेंद्र यांनी केवळ हिंदीच नव्हे तर पंजाबी चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी एका मराठी चित्रपटातही भूमिका केली. अभिनेते धर्मेंद्र यांनी काही चित्रपटाची निर्मितीही केली. सनी देवल आणि बॉबी देवल या आपल्या मुलांसाठी त्यांनी अनुक्रमे बेताब आणि बरसात या चित्रपटांची निर्मिती केली. अभय देवल या आपल्या भाच्यासाठीही त्यांनी सोचा न था या चित्रपटाची निर्मिती केली. पुढे त्यांनी राजकारणातही प्रवेश केला. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राजस्थान मधील बिकानेर मधून भाजप कडून निवडणूक लढवली आणि जिंकली पण राजकारण हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणातून निवृत्ती स्वीकारीत पुन्हा आपला मोर्चा अभिनयाकडे वळवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. २०१२ साली भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ चित्रपट सृष्टीवर आणि प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा महान कलाकार प्रेक्षकांना सोडून गेला. त्यांचे जाणे अकाली नव्हते तरीही त्यांचे जाणे प्रेक्षकांसाठी चटका लावून जाणारे ठरले.

**अभिनेते धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**

# आता ओढ रामराज्याची.....!



श्रीराम जन्मभूमी अयोध्येत रामल्लाची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर तब्बल ६७३ दिवसांनी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यांच्या हस्ते श्रीराममंदिरावर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सरसंघचालक मोहन भागवत आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. सकाळी अभिजित मुहूर्तावर माननीय पंतप्रधानांनी बटन दाबताच २ किलोचा धर्मध्वज हळूहळू वर जात १६१ फूट उंचीवर ध्वजस्तंभावर स्थिर झाला. डोळ्यांचे पारणे फेडणारे ते अविस्मरणीय दृश्य भारतीयांसह समस्त जगभरातील श्रीरामभक्त पाहत होते. परमपवित्र श्रीरामजन्मभूमीत प्रभू श्रीरामांच्या मंदिरांचे बांधकाम अखेर पूर्ण झाले. भविष्यात भारताचा इतिहास जेव्हा केव्हा मांडला जाईल तेव्हा २२ जानेवारी २०२४ आणि २५ नोव्हेंबर २०२५ हे दोन दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिले जातील. येणारी पिढी आताच्या पिढीचे गोडवे गाईल कारण आजच्या पिढीला जे भाग्य लाभते आहे, ते मागील सहा-सात पिढ्यांच्या नशीबी नव्हते. आज आपण क्रांतिकारकांचे गोडवे गातो, कारण भारतमातेला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी त्यांनी घरादारावर तुळशीपत्र ठेवले, छातीवर इंग्रजांच्या गोळ्या झेलल्या, हसत हसत बलीवेदीवर चढले. त्यांच्या त्यागाचे चीज झाले. भारतभूमीला स्वातंत्र्य मिळाले. साऱ्या भारतभूमीचे आराध्य दैवत असलेल्या श्रीरामांचे त्यांच्याच जन्मभूमीत मंदिर उभारण्यासाठी ५०० वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटला. या कालखंडात शेकडो रामभक्तांनी तीव्र संघर्ष केला, जुलमी आक्रमकांनी श्रीराममंदिर पाडून त्यावर उभारलेले बांधकाम पाडण्यासाठी कित्येक कारसेवकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यामध्ये कित्येकाचें पुत्र होते, कित्येकांचे भाऊ होते तर कित्येकांचे पती होते. या सर्वांनी आपल्या रक्ताच्या नात्यातील सदस्य श्रीराम मंदिर उभारणीसाठी त्यागला आहे.

श्रीराम सर्वार्थाने आदर्श होते. त्याकाळी जेव्हा राजे आणि राजपुत्र एकाहून अधिक विवाह करत त्याकाळीही श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. पत्नीच्या हरणानंतर वानरांचे संघटन करून त्यांनी बलाढ्य अशा रावणाचा वध केला आणि सीतामातेची सुटका केली. अश्वमेध यज्ञाच्या वेळी यजमान म्हणून विधी करण्यासाठी पत्नीची आवश्यकता असताना त्यांना दुसरी पत्नी करण्याचा सल्ला दिला गेला; मात्र श्रीरामप्रभूंनी सीतामातेची प्रतिकृती बनवून तिला शेजारी ठेवले आणि यज्ञविधी पूर्ण केले. पत्नीशी एकनिष्ठ राहण्याचा आदर्श यानिमित्ताने त्यांनी जगासमोर ठेवला. आजमितीला समाजात अनैतिकता बोकाळलेली पाहायला मिळते. विवाहित असताना विवाहबाह्य संबंध ठेवले जातात. नात्याचा अडसर नको म्हणून लिव्ह इन रिलेशनशिपचा करार करण्याचे पाश्चात्यांचे स्तोम याला न्यायालयीन मान्यता मिळाल्याने भारतातही मोठ्या प्रमाणात माजू लागले आहे.

भारतीय संस्कृतीला न शोभणाऱ्या या फॅडमध्ये आता गुन्हेगारीचा शिरकाव होऊ लागला आहे. सहकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या छळाचे, फसवणुकीचे गुन्हे नोंद होऊ लागले आहेत. एकमेकांचे जीव घेतले जात आहेत. आईवडिलांच्या विरोधाला न जुमानता घेतलेल्या निर्णयात फसवणूक झाल्याने काही मुली आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत. कित्येक मुलींचे जीवन यामध्ये उध्वस्त होत आहे. शारीरिक गरजा भागवण्यासाठी अनैतिकतेला कागदी कराराचे नैतिक लेबल लावून निर्माण झालेल्या संबंधांत नात्याचा गोडवा कुठून येणार ? नैतिकतेचा आदर्श प्रभू श्रीरामांनी आपल्यासमोर ठेवला आहे तो पुनर्जीवित करण्याचे दायित्व आजच्या पिढीवर आहे. वडिलांनीं सावत्र आईला दिलेल्या वचनाचा मान राखत प्रभू श्रीरामांनी १४ वर्षांचा वनवास पत्करला. एकीकडे राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असताना अचानकपणे आलेला वनवास प्रभूंनी हसत हसत स्वीकारला.

वनवासातून परतल्यानंतर कोणताही पूर्वग्रह मनात न बाळगता प्रभू श्रीरामांनी माता कैकयीचे पदस्पर्श करून आशीर्वाद घेतले. कुठे संपत्तीसाठी जन्मदात्या आईची हत्या करणारी आजची पिढी आणि कुठे वनवास देणाऱ्या सावत्र आईंशीही सख्ख्या आईच्या मायेने प्रेम करणारे प्रभू श्रीराम. रावणाचा वध केल्यानंतर त्याचे अंत्यसंस्कार करण्यास विभीषण तयार नव्हते, अशावेळी 'मरणांती वैराणी' या वचनानुसार प्रभू श्रीरामांनी बंधुत्वाच्या नात्याने रावणाचे अंत्यसंस्कार करण्याची तयारी दर्शवली. संकटकाळात सुग्रीव आणि विभीषणाला साहाय्य करून प्रभू श्रीरामांनी मित्रत्वाचा आदर्श जगासमोर ठेवला. प्रभू श्रीराम एकवचनी होते. मुखातून निघालेला प्रत्येक शब्द हा सत्यच असायचा. वनवासात असताना श्रीरामांनी अनेक शापित जीवांचा उद्धार करून आपले अवतारत्व सिद्ध केले होते.

श्रीराम जन्मभूमीत श्रीराम विराजमान झाले. श्रीरामांच्या कृपेनेच मंदिराचे बांधकाम पूर्ण होऊन मंदिरावर धर्मध्वजाचे आरोहण सुद्धा झाले. आता पुढील लक्ष्य हिंदुस्थानात रामराज्य पुनर्स्थापित करण्याचे असायला हवे. श्रीरामांना अपेक्षित रामराज्य आणण्याचे मोठे दायित्व यापुढे आपल्या प्रत्येकाच्या खांद्यावर असेल. भगवंताच्या कृपेने आणि श्रीरामभक्तांच्या प्रयत्नांनी ५०० वर्षांनंतर श्रीरामजन्मभूमीत राम मंदिर उभे राहिले, असेच प्रयत्न सुरु ठेवले तर रामराज्यही दूर नाही. राम राज्य म्हणजेच आदर्श राज्य. जिथे समस्त जीव गुण्यागोविंदाने नांदतील. जिथे सज्जनांचे रक्षण होईल आणि दुर्जनांचे निर्दालन केले जाईल. जिथे अनाचार, अत्याचार आणि भ्रष्टाचार यांना स्थान नसेल. देशात रामराज्य आणायचे असेल तर सर्वप्रथम रामराज्याची स्थापना आपल्या मनात करावी लागणार आहे.

त्यासाठी मनातील दोषांचे निवारण आणि गुणांचे संवर्धन करण्याचे प्रयत्न आपल्याला करावे लागतील. 'सामर्थ्य आहे चळवळीचे जो जो करील तयाचे परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे' या समर्थांच्या वचनानुसार सामाजिक स्तरावर कार्य करताना प्रत्येक वेळी भगवंताचे अधिष्ठान असणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी रोहिडेश्वराला साक्षी ठेवून हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. साक्षात आई भवानीचे त्यांना आशीर्वाद होते. समर्थ रामदासस्वामी आणि संत तुकारामांसारख्या महान संतांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. महाराजांच्या मुखात सदैव जगदंब जगदंब हा जप असे.

आई भवानीची कृपा आणि स्वराज्यनिष्ठ मावळ्यांची साथ यांच्या बळावर शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. नामस्मरणाचा महिमा अगाध आहे. नामस्मरणाने मनाची शुद्धी होते, सत्संगाने नामस्मरणाला चालना मिळते. अंतर्बाह्य शुद्धी होऊन अंतःकरणात रामराज्य आले कि समाजात रामराज्य स्थापन होण्यास वेळ लागणार नाही. कधीकाळी असाध्य वाटणारे श्रीराम मंदिराचे ध्येय आज पूर्ण झाले. भारतभूमीमध्ये रामराज्याची पहाटही लवकरच पाहायला मिळावी यासाठी प्रभू श्रीरामचंद्राच्या चरणी प्रार्थना करूया !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

## सर्व्हे आपले..

अधून मधून पक्षांनी
करावे सर्व्हे अंतर्गत
आत्म परिक्षण गरज
पध्दत करेलं सुसंगत

सर्वेक्षणकर्ते निष्णात
असावे पूर्ण अधिगत
परिक्षक हो अभ्यासू
नियमजया मुखोत्गत

भीडभाड नकोकाही
स्पष्टसांगावे अनागत
नकारात्मक रिपोर्टचे
करे खुलेपणे स्वागत

खास करावी नियुक्ती
सर्वेस्तव नेमा पारंगत
गरज भासली कसली
खास आणे अभ्यागत

ऑनलाईन मिळे सोई
नवीन एआयचे जगत
मिळू शकतात साधने
कला अभ्यासअवगत

विवादनसो आपसांत
मिटून टाका कलागत
वेळीच सावरावे चुका
वर्तन करावे सु संगत

गंभीरतने घ्यावे सर्व्हे
संधी येत नसते परत
फाटूनजाई सर्वकाही
वस्त्रे जात असे विरत

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# बॉलीवूडचे देखणेपण हरपले..!!

रुबाबदार, देखणे, व्यक्तिमत्त्व, दमदार संवादफेक भल्याभल्या गुंडांचा एकट्याने सामना करत त्यांना लोळवणारा नायक, भावनाप्रधान प्रियकर, शेतकरी अशा बहुरंगी, बहुढंगी प्रतिमेने थोडी थोडकी नव्हे तर तब्बल ६० वर्षे हिंदी चित्रपटसृष्टीवर आपल्या अभिनयाचे साम्राज्य निर्माण करणारा, चित्रपट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा, प्रचंड लोकप्रिय अभिनेता धर्मेंद्र यांनी अखेर जगाचा निरोप घेतला आणि त्यांचे चार पिढ्यांचे कोट्यवधी रसिक हळहळले. गेले महिनाभर त्याची मृत्यूशी अखेरची झुंज सुरू होती. वयाच्या ८९ व्या वर्षात सुरू झालेली ही झुंज अखेर वृध्दापकाळने, त्याच्या प्रकृतीने साथ न दिल्याने संपली. तो उपचारासाठी रुग्णालयात असतानाच त्याच्या मृत्यूच्या अफवाही पसरल्या होत्या. अखेर त्याने वयाच्या ८९ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला.

अखंड भारतातल्या ब्रिटिशकालीन पंजाब राज्यातल्या लुधियाना जिल्ह्यात जन्मलेल्या धर्मेंद्रचे मूळ नाव कृष्ण देओल. शिक्षणानंतर आपल्या शेतीत राबणाऱ्या कृष्णला नियतीने हिंदी चित्रपटसृष्टीत आणले. १९६० मध्ये हिंदी चित्रपटसृष्टीत प्रदार्पण केलेल्या कृष्णचे नाव धर्मेंद्र असे झाले आणि त्याच नावाने आपल्या सुरेख, सकस अभिनयाच्या बळाने तो लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचला. हिंदी चित्रपटसृष्टीतल्या २६० च्या वर चित्रपटात नायक, सहनायक आणि अगदी चरित्र नायकाच्या भूमिकाही त्याने जीवन ओतून साकारल्या. कोणतीही भूमिका लहान मोठी न समजता त्या भूमिकेला त्याने आपल्या अभिनयाच्या बळावर न्याय दिला. हाणामारीच्या चित्रपटाचा तर तो नायकच होता. शोले, चुपके चुपके, दादागिरी, दिल्लगी, जीवन-मृत्यू, सत्यकाम, अनुपमा, किनारा, स्वामी या त्याच्या चित्रपटातल्या भूमिका प्रचंड गाजल्या. गेली ५० वर्षे चार पिढ्यांच्या चित्रपट



रसिकांवर लोकप्रियतेचे गारूड घालणाऱ्या शोले चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी त्याचे हेमामालिनीशी प्रेम जुळले आणि विवाहित असतानाही त्याने तिच्याशी विवाह केला. तो गाजलाही. चित्रपटसृष्टीतला अभिनय हा त्याचा श्वास आणि ध्यास होता. या माया नगरीत प्रदीर्घ काळ राहून प्रचंड पैसा, कीर्ती, संपत्ती मिळाल्यावरही त्याचा साधेपणा शेवटपर्यंत कायम राहिला.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर.**

हिंदी चित्रपटात सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नायकाच्या भूमिका त्याने विलक्षण ताकदीने साकार केल्यानेच चित्रपट रसिकांचा तो लाडका नायक ठरला. आपल्या मुलांना चित्रपटसृष्टीत आणण्यासाठी त्याने स्वतःची चित्रपट निर्मितीची संस्था सुरू केली आणि मुलांचे हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पणही केले. सनी देओल आणि बॉबी देओल ही त्याची मुले आपल्या अभिनयाच्या बळावर लोकप्रिय झाली.बसंती इन कुत्तो के सामने मत नाचना। हा शेलोमधला त्याचा संवाद प्रचंड गाजला तर अन्य चित्रपटातीलही त्याचे संवाद अजरामर झाले. जीवनाच्या उत्तरार्धात मायानगरीतला झगमगाट, प्रसिध्दी, लौकिक हे सारे सोडून धर्मेंद्र लोणावळ्याजवळच्या आपल्या शेतात आपली पहिली पत्नी प्रकाश कौर यांच्यासह शांतपणे शेतकऱ्याचे जीवन जगत होता. काही काळ तो खासदारही होता. पण राजकारणात तो रमला नाही. राजकारण सोडून तो पुन्हा शेतकरी झाला. काळ्या मातीत राबणे, गाई-म्हशींच्या सहवासात राहणे आणि सेंद्रिय शेतीत प्रयोग करणे हेच त्याच्या जीवनाच्या उत्तरार्धातले जीवन होते. हाडाचा शेतकरी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतला अभिनायक असलेला धर्मेंद्र जगाचा निरोप घेऊन गेला असला तरी चित्रपटाच्या अभिनयाने तो चिरंजीवच आहे.


**लोकप्रियता असूनही राजकीय प्रवास अपयशी...**

हिंदी चित्रपटसृष्टीतील 'ही-मॅन' धर्मेंद्र यांनी २००४ मध्ये भाजपच्या तिकिटावर बिकानेरहून लोकसभेची निवडणूक जिंकली होती. या ज्येष्ठ अभिनेत्यावर २००४ मध्ये भाजपच्या स्विंग इंडिया मोहिमेचा खूप प्रभाव पडला. त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला. शत्रुघ्न सिन्हा यांच्यासोबत त्यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेतली. या भेटीतून त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. भाजपने धर्मेंद्र यांना राजस्थानमधील बिकानेर येथून उमेदवारी दिली. त्यांच्या लोकप्रियतेच्या जोरावर, धर्मेंद्र यांनी काँग्रेसच्या रामेश्वर लाल दुडी यांचा जवळजवळ ६०,००० मतांनी पराभव केला आणि संसदेत त्यांची जागा मिळवली. त्यानंतर पाच वर्षांनी त्यांची राजकीय कारकीर्द निराशेत बदलली. त्यांनी पुन्हा कधीही निवडणूक न लढवण्याची शपथ घेतली.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## संविधान दिनानिमित्त नमुंमपा मुख्यालयात उद्देशिकेचे सामूहिक वाचन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** संविधान दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, मुख्य विधी अधिकारी अभय जाधव, शिक्षणाधिकारी अशोक कडुस, इस्टेट मॅनेजर अशोक अहिरे, सहा. आयुक्त शिल्पा देशपांडे, प्रशासकीय अधिकारी रवी जाधव व इतर अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्विकृत करुन २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. संविधानाचे महत्त्व अनेक स्तरांवर असून भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्ध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, तसेच दर्जा व संधीची समानता प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा विचार केलेला आहे. देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत संविधान महत्वपूर्ण भूमिका बजावते. त्या अनुषंगाने आज संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांचे समवेत सामुहिक वाचन करण्यात आले. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने घर घर संविधान उपक्रम सर्वत्र उत्साहात राबविण्यात येत असून नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. आज संविधान दिनानिमित्त म हानगरपालिका कार्यालये व शाळांमध्ये ही संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले, तसेच विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे २६/११/२००८ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलीस अधिकारी, कर्मचारी, जवान, नागरिक यांना भावपूर्ण श्ध्दांजली अर्पण करण्यात आली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे संविधान दिन साजरा



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२६, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुका विकास मंडळ संचेतीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान उद्देशिका व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक आदरणीय शांताराम बैकर, शिक्षक प्रतिनिधी राजकुमार सूर्यवंशी व शिक्षक – शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री प्रमोद जाधव यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. या दिवशी विद्यालयामध्ये संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. संविधान दिनाचे औचित्य साधून विद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी संविधान उद्देशिकेचे महत्व व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. या दिवशी विद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक प्रमोद जाधव यांनी संविधान उद्देशिका व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान उद्देशिका लिहिण्या बाबतचे योगदान व सामाजिक कार्याविषयी माहिती प्रकट केली. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक आदरणीय अर्जुन हुल्लोळी यांनी जनजागृती करण्यासाठी आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष आबासाहेब हुलगे यांनी दरवर्षी २६ नोव्हेंबरला संविधान दिवस साजरा का केला जातो. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू करण्यात आले. भारतीय राज्यघटनेत ४४८ कलमे आहेत संविधान लिहिण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना २ वर्ष ११महिने १८दिवस लागले. हे कायदे सरकारची रचना, अधिकार, कर्तव्य आणि नागरिकांचे हक्क व कर्तव्य निश्चित करतात हे संविधान देशाचा कारभाराचा पाया आहे. देशासाठी सर्वोच्च कायदा म्हणून कार्य करते. या विषयी सखोल माहिती सांगितली. शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योती राणे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## लक्ष्मण देवराम सोनावणे महाविद्यालयात संविधान दिन संपन्न





**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२६, कल्याण (ठाणे) :** १९४९ भारतीय संविधानाच्या दिनाच्या अनुषंगाने कल्याण पश्चिम मधील लक्ष्मण देवराम सोनावणे महाविद्यालयात संविधान दिन उत्सहात साजरा करण्यात आला. या आनंदाच्या प्रसंगी प्रो. अँनी अँटोनी – प्र प्राचार्य त्याच बरोबर कॉलेजचे प्रा. डॉ. राजदीप मोरे आणि युवा संघर्ष संस्थे अमोल जगधनी यांची प्रमुख उपस्थिती राहिली, सोबत प्रा.गुरुनाथ बोरचटे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. तर प्रा.सायली उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून युवा संघर्ष संस्थेचे सल्लागार ॲड.राहुल पगारे होते. सोबत संस्थेच्या सदस्यां हर्षदा पगारेयांची उपस्थिती लाभली. प्रा.डॉ.राजदीप मोरे सरांनी सुरुवातीलाच भारतीय संविधान किती महत्वाचे आहे याची माहिती विध्यार्थीयांना करून दिली, तर ॲड.राहुल पगारे यांनी व्याख्यानाची सुरुवात करताना भारतीय संविधाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून कायद्या विषयक माहिती, फोजदारी खटले, संविधानातील अनुच्छेद, मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्य, अशा विविध विषयांची माहिती करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय मूल्यांवर उभे असलेले भारतीय संविधान आणि या संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति आपण किती ऋणी असले पाहिजे याची जाणीव करून दिली. काही विध्यार्थी यांनी संविधानावर गीत सादर केले. त्याच बरोबर युवा संघर्ष संस्थेच्या वतीने भारतीय संविधाच्या प्रास्ताविकेची फ्रेम कॉलेज ला भेट देण्यात आली. अतिशय उत्सहात समारोह संपन्न झाला.

## शालेय विद्यार्थी - विद्यार्थिनींसाठी एसटी ची '१८०० २२१ २५१ हेल्पलाईन सुरू' - परिवहन मंत्री सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, मुंबई :** शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी – विद्यार्थिनींना घरातून शाळेला जाताना अथवा शाळेतून घरी येताना एसटी प्रवासात काही अडचण आल्यास अथवा एसटी बसेस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द करण्यात आल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी, यासाठी एसटी महामंडळाची १८०० २२१ २५१ या क्रमांकाची हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यभरातील लाखो विद्यार्थी – विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी व तेथून घरी येण्यासाठी एसटी महामंडळ बस फेऱ्या उपलब्ध करून देत असते.

राज्य शासन एसटीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना घरातून शाळेला जा – ये करण्यासाठी मासिक पासमध्ये ६६.६६ टक्के सवलत दिली जाते. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत मासिक पास दिला जातो.मंत्री सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली असता, तेथे उपस्थित असणाऱ्या शालेय विद्यार्थी– विद्यार्थिनींनी अनेक समस्या व तक्रारी त्यांच्यासमोर मांडल्या. अनेक शालेय बसेस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बसेस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार काही विद्यार्थ्यांनी केली. संध्याकाळच्या वेळी शाळा– महाविद्यालय सुटल्यानंतर




किमान एक तासात मुले आपल्या घरी जाणे अपेक्षित असते. परंतु, बसेस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास खूप उशीर होतो.शालेय विद्यार्थी – विद्यार्थिनींना घरून शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बसेस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे, तांत्रिक बिघाडामुळे बस नादूरूस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी तातडीने एसटीच्या हेल्पलाइन क्रमांक वर संपर्क करून मदत मिळावी, या हेतूने १८०० २२१ २५१ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आलेला आहे. या क्रमांकावर विद्यार्थी – विद्यार्थिनींनी संपर्क साधावा, जेणेकरून त्यांना तातडीने मदत उपलब्ध करून देता येईल, त्याचबरोबर, संबंधित शाळा, महाविद्यालयांना ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे दुरध्वनी संपर्क क्रमांक देण्यात येत आहेत, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच थेट विद्यार्थी– विद्यार्थ्यांनी देखील या विभाग नियंत्रकांना संपर्क करून आपल्या समस्या मांडू शकतात.

एसटी बसेस उशिरा सुटणे, अचानक रद्द होणे अथवा अन्य कारणामुळे शालेय विद्यार्थी– विद्यार्थिनींचे तास चुकतात किंवा परीक्षेला ते वेळेवर पोहोचू शकत नाहीत, काही वेळेला त्यांची महत्त्वाची परीक्षा देऊ शकत नाहीत. विद्यार्थ्यांच्या अशा शालेय नुकसानीला संबंधित क्षेत्रातील आगार व्यवस्थापक व त्यांचे पर्यवेक्षक यांना जबाबदार धरण्यात येईल. त्याचप्रमाणे, सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी ५–६ या वेळेत मुख्य बसस्थानक व ज्या ठिकाणी विद्यार्थी चढ– उतार जास्त होते, अशा थांब्यावर संबंधित आगाराच्या पर्यवेक्षकांनी गणवेशात थांबून वाहतुकीचे नियोजन करावे. शाळेचा शेवटचा मुलगा अथवा मुलगी बसने सुखरूप घरी जाईपर्यंत संबंधित पर्यवेक्षकांनी तेथून हलू नये, अशा स्पष्ट सूचना मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिलेल्या आहेत.

शालेय बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामूळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची लेखी तक्रार संबंधित विद्यार्थी अथवा विद्यार्थिनींनी तसेच संबंधित शाळा – महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी केल्यास जितक्या दिवसाचे शालेय नुकसान होईल, तितके दिवस यास जबाबदार असणारे पर्यवेक्षक अथवा अधिकाऱ्यांना निलंबित अथवा सक्तीच्या रजेवर पाठवण्यात यावे, असे निर्देशही परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या महाव्यवस्थापक (वाहतूक) यांना दिले आहेत.

## विंचूरमध्ये चंपाषष्टी उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद; खंडोबाच्या जयघोषात सोन्याचे विंचूर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी, म्हणजेच चंपाषष्ठीच्या पावन दिवशी विंचूर शहरात पारंपरिक बारागाड्या उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. मणी–मल्ल दैत्यांचा पराभव करून खंडोबाने लोकांना संकटमुक्त केले. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ हा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो.चंपाषष्ठी म्हटलं की विंचूरच्या बारागाड्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. परिसरातील तसेच दूरदूरून आलेल्या भाविकांच्या उपस्थितीत या वर्षी बारागाड्या मोठ्या उत्साहात ओढण्यात आल्या. खंडेराव महाराज की जय!च्या जयघोषात निघालेल्या शोभायात्रेमुळे जणू संपूर्ण शहर सोन्याचे विंचूर बनून गेले होते.

**तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग उत्सव आयोजनात कौतुकास्पद भूमिका**

यंदाच्या उत्सवात सर्वात विशेष बाब म्हणजे तरुण पिढीचा उत्साहपूर्ण सहभाग. त्यांनी संपूर्ण



नियोजन अत्यंत शिस्तबद्धपणे आणि यशस्वीरीत्या पार पाडले. यावर्षी नवरदेव म्हणून बारागाड्या ओढण्याचा मान सुनील रमेश सोनवणे यांना मिळाला. संस्कृती जपण्याचा असा पुढाकार तरुणाईने कायम ठेवावा, असे मत ज्येष्ठ जाणकारांनी व्यक्त केले.

**शोभायात्रा आणि जत्रेची गर्दी**

विंचूर शहरातील मुख्य रस्त्यांवरून आकर्षक सहवाद्यासह भव्य शोभायात्रा काढण्यात आली. तर शाळेच्या मैदानावर भरलेल्या मोठ्या जत्रेत राहट पाळणे, ब्रेकडान्स, विविध मनोरंजन खेळ, तसेच मि ठाईची अनेक दुकाने यामुळे वातावरण अधिक रंगतदार झाले.

विशेषतः विंचूरची प्रसिध्द जिलेबी विकत घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. खंडेराव महाराज मंदिरात विशेष रोषणाई, चंपाषष्ठी निमित्त खंडेराव महाराज मंदिर आकर्षक रोषणाई व सजावटीने उजळून निघाले होते. ९ दिवसांच्या जागरण कार्यक्रम ातही भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. घरोघरी तळी भरण्याची परंपरा या दिवशी घरोघरी तळी भरून, वांग्याचे भरीत व बाजरीची भाकरीचा नैवेद्य दाखवण्याची पारंपरिक पद्धत पाळली जाते. खंडेराव महाराजांचा जयघोष करीत घराघरांतून भक्तिभाव व्यक्त करण्यात आला. याच दिवशी चार्तुमासाची समाप्ती होत असल्याने उत्सवाला अधिक धार्मिक महत्त्व लाभते.

## मीरा रोड येथे प्लास्टिक कचरा प्रक्रिया एमआरएफ प्लांटचे उद्घाटन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२६, मीरा भाईंदर :** भारतातील सर्वात स्वच्छ महानगरपालिकेचा पुरस्कार जिंकणाऱ्या मीरा भाईंदर म हानगरपालिकेने स्वच्छतेच्या बाबतीत भारताच्या इतिहासात प्रथमच महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टिक कचरा व्यवस्थापनाला चालना दिली आहे. बिस्लेरी इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडने मीरा रोड (पूर्व) येथील डेल्टा डी–म ार्टजवळ एक आधुनिक एम आरएफ प्लांट तयार केला आहे आणि माननीय आयुक्त आणि प्रशासक यांच्या हस्ते प्लांटचे उद्घाटन केले गेले.प्लास्टिक कचरा नष्ट करण्याऐवजी, कचऱ्याचे संसाधनात रूपांतर करणे आणि पर्यावरणाचे रक्षण करताना विकास करणे या विचारसरणीने शहराने एक मोठे पाऊल उचलले




आहे. उद्घाटन समारंभाला महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ आणि बिस्लेरी इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. शहर स्वच्छ करण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना विशेष सन्मानित करण्यात आले. या प्रेरणा केंद्राच्या वैशिष्ट्यांमध्ये प्लास्टिक कचऱ्याचे उपयुक्त वस्तूंमध्ये रूपांतर करण्याच्या पद्धतींचे प्रात्यक्षिक, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करण्याबाबत मार्गदर्शन, घरे, सोसायट्या, शाळा आणि व्यवसायांसाठी कचरा व्यवस्थापन प्रशिक्षण, नैसर्गिक कंपोस्ट बनवण्याच्या प्रक्रियेची माहिती आणि मुले आणि विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण अभ्यास दौरे यांचा समावेश आहे. अधिकाऱ्यांच्या मते, हे ठिकाण केवळ यंत्रे आणि प्रदर्शने पाहण्यासाठी नाही तर नागरिकांना स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाची मूल्ये प्रेरणा देणारे, मार्गदर्शन करणारे आणि समजावून सांगणारे केंद्र आहे. कचरा ही समस्या नसून एक मौल्यवान संसाधन आहे या कल्पनेला बळकटी देणे हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे. शहराला अधिक पर्यावरणपूरक बनवण्यासाठी, कचरा वर्गीकरण पूर्णपणे अंम लात आणणे, डंपिंग यार्डमध्ये पाठवला जाणारा कचरा कमी करणे आणि पुनर्प्राप्ती वाढवणे आणि पिढ्यानपिढ्या पर्यावरण जागरूकता पसरवणे हे ध्येय ठेवण्यात आले आहे. सम ारंभात, प्लास्टिक कचऱ्यापासून बनवलेल्या अनेक वस्तू जसे की बेंच, पुस्तके, महिलांसाठी पर्स आणि बॅग्ज, डायरी, पेन स्टँड, टी–शर्ट, प्लास्टिकच्या बाटल्यांपासून बनवलेले आकर्षक छत अशा प्रदर्शनात ठेवण्यात आले. वक्त्यांनी सांगितले की, शहर स्वच्छ ठेवण्यात नागरिकांची भूमिका सर्वात महत्त्वाची आहे, म्हणूनच प्रत्येक घरातील ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंना प्राधान्य देणे आणि निसर्गप्रेमी जीवन स्वीकारणे अत्यावश्यक आहे. हे प्रेरणा केंद्र शहरासाठी एक मैलाचा दगड ठरेल आणि भविष्यात इतर शहरांसाठीही ते अनुसरण्यासाठी प्रेरणा ठरू शकते.

## संविधान दिनाचे औचित्य साधून 'भारतीय राज्यघटना' पुस्तकाचे प्रकाशन

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२७, सोलापूर :** संविधान दिनानिमित्त पार्क चौक येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासम ोर एमपीएससी परीक्षेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या 'भारतीय राज्यघटना' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ उत्साहात पार पडला. एमपीएससी आयोगाच्या पूर्वी झालेल्या परीक्षांचे पेपर विश्लेषण, राज्यघटनेवरील महत्वाची माहिती आणि अभ्यासासाठी मार्गदर्शनात्मक स्वरूप हे



पुस्तकाचे वैशिष्ट्य असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाचे कला शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.वसंत कोरे व प्रा.डॉ.संगमेश्वर नीला उपस्थित होते. त्यांच्यासोबत दयानंद कॉलेजचे माजी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. रविकिरण शिंदे, प्राध्यापक रेवणसिद्ध बेरूनगीकर, प्रा.अभिजित जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी लेखकांनी मनोगत व्यक्त करताना भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीम ागील ऐतिहासिक प्रवासाचा विशेष उल्लेख केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ६० विविध देशांच्या राज्यघटनांचा तसेच १९३५ च्या ब्रिटिश संसदेच्या कायद्याचा सखोल अभ्यास करून जगातील सर्वोत्तम संविधान भारताला दिले. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी तब्बल २ वर्षे, ११ महिने, १८ दिवस अहोरात्र कष्ट केले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी घटना स्वीकारली आणि त्यानंतर या दिवसाला 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. आज त्याच दिवसाचे औचित्य साधून माझे पुस्तक प्रकाशित होत असल्याचा मला अभिमान आहे, असे लेखकांनी सांगितले.

